'लेक लाडकी अभियान' प्रस्तुत



# पथनाट्य

## एक जिवंत नाटक....





Written By :

***Kailas Jadhav***

Financial Support By :

***United Nations Population Fund***

UNFPA

United Nations
Population Fund - India

Special Thanks

***Adv. Varsha Deshpande***

Publisher :

***Lek Ladki Abhiyan***

490/A, 'Muktangan', Guruwar Peth,
Satara (Mah) - 415 002
Ph. 02162-221031
email : dmvm1991@gmail.com

# मनोगत

**प्रिय साथी,**

खरे तर पथनाट्याची संहिता नसावी, प्रश्नांवर चर्चा करून उत्स्फुर्तपणे पथनाट्याची संहिता आकाराला येत असते. परंतु बदललेल्या गतिमान जगात यासाठी वेळ देणे कधी कधी शक्य नसते. म्हणून या पुस्तकाद्वारे 'स्त्री-पुरूष विषमता आणि हिंसा' या विषयावर भाष्य करणारे 'समता युवा जागर'च्या माध्यमातून तयार झालेल्या आणि सादर झालेल्या पथनाट्याच्या काही संहिता आम्ही प्रसिद्ध करीत आहोत. पथनाट्य संहिताही शब्द कमी आणि सादरीकरणाच्या माध्यमातून आकार घेत जाणारी कलाकृती आहे.

आपण वाचक म्हणून ही पथनाट्ये व लघुनाटीका केवळ वाचणार नाही तर ती सादर कराल आणि आपल्या विचारांची त्यात अधिक भर घालाल, अशी आशा आहे. एक कलाकार म्हणून नाटक, शाहीरी, वादय, माहितीपट, पथनाट्य अशी विविध माध्यमे विचार मंचावर गेली २० वर्षे स्त्री-पुरुष समतेचा धार्मिक आणि जातीय सलोख्याचा विचार आणि विषय घेवून मी सातत्याने करत आलो आहे.

आपण सर्वांनी वेळोवेळी नेहमीच ते कौतुकाने स्वीकारले आहे. तुम्ही केलेल्या बहुमोल सूचनांनी एक व्यक्ती म्हणून आणि कलाकार म्हणून मला समृध्द केले आहे. त्याच प्रेमाने या पुस्तकाचे तुम्ही स्वागत कराल, याची खात्री आहे.

या पुस्तकांची अक्षर जुळणी व मांडणी करून देणारे **धनंजय यादव**, पथनाट्य सादर करणारे 'समता युवा जागर' चे कलाकार, शिरुर कासार, जि. बीड येथील किशोरी प्रकल्पातील सर्व कलाकार, 'लेक लाडकी अभियाना'चे सर्व कार्यकर्ते, यु.एन.एफ.पी.ए. च्या **अनुजा गुलाटी**, शुद्धलेखन तपासून देणारे **प्रा. संजीव बोंडे** तसेच **बसंती दायमा** यांचे विशेष आभार...!

सध्याच्या जगात इंटरनेट, फेसबुक, व्हॉटस्अप, मेल, ब्लॉग्ज, यूट्युब यामुळे कोणतीही घटना चूक-बरोबर संपूर्ण जगासमोर मांडता येते, पोहचवता येते. असे जरी असले तरी आजही रस्त्यावर सादर  होणारे पथनाट्य हे चळवळ गतिमान करण्याचे एक प्रभावी आणि जहाल माध्यम आहे. म्हणून चळवळीतील कार्यकर्त्यांना आणि नाट्यकर्मींना पथनाट्याचे आजही महत्व वाटते.

प्रश्नांना थेट रस्त्यावर भिडणारे, समाजावर, माणसांवर प्रभाव पाडणारे, निर्भय माणसाच्या हाती दिलेले हे एक धारदार अहिंसक, शब्दशस्त्रच आहे. पथनाट्य लोकांचे प्रश्न लोकांसमोर मांडून, लोकांमध्येच जनसुनवाई करणारा लोकशाहीचा आविष्कार.

पथनाट्याची संहिता, पथनाट्याचे संगीत,पथनाट्यात काम करणारे कलाकार आणि पथनाट्याचा विषय या सगळ्या गोष्टींचा एकाचवेळी, एकत्रित परिणाम करणारा पथनाट्य हा सुंदर नाट्याविष्कार आहे. पथनाट्य सादर करणाऱ्या कलाकाराला फक्त नाटक, कला सादर करता येणे पुरेसे नाही. त्याची वैचारिक स्पष्टता ही असावी लागते. चुकीच्या घडणाऱ्या घटना, प्रथा, व्यवस्था यांच्या संदर्भातील आपले मत व्यक्त करण्याचा, विरोध करण्याचा, भूमिका मांडण्याचा, दिसायला साधा, सोपा वाटणारा आत्यंतिक प्रभावी नाट्याविष्कार म्हणजे पथनाट्य, सडकनाट्य. सादरीकरणासाठी आव्हानात्मक नाट्यप्रकार म्हणजे सडकनाट्य.'स्ट्रीट-प्ले'. समाज बदलासाठीचे प्रभावी माध्यम म्हणजे पथनाट्यच.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळात भारतीय राज्यघटनेने सर्व भारतीयांना अभिव्यक्ती स्वातंत्र्य बहाल केले. सर्वांना दर्जाची व संधीची समानता प्राप्त करून दिली. हिंसामुक्त  समाज बनणे शक्य केले. परंतु आजही धर्म, जात, लिंगभेदावर आधारित असमानता आणि त्यामुळे होणारी हिंसा ही भारत देशासमोरील सर्वात मोठी राजकीय समस्या बनली आहे ही समस्या या पुस्तकाच्या रुपाने सादर केलेल्या पटनाट्य आणि लघुनाटीका च्या माध्यमातून समाज मानसात परिवर्तन घडविण्यासाठी प्रभावीपणे काम करतील असा आम्हाला दृढ विश्वास वाटतो.



# महिला आरक्षण

(मुल-मुली फेर धरून रिंगण तयार करतात)

दवंडीवाला : ऐका हो ऐका

आला तर हसाल नाय आला तर फसाल. आज आम्ही आपल्यासमोर पथनाट्य सादर करणार आहोत. पथनाट्याचे नांव आहे महिला आरक्षण

निवेदक : मंडळी आमच्या गावात एक दिवशी सरपंच रस्त्यावरून चालत असताना पोलीस पाटील तेथे येतात व त्या दोघामध्ये संवाद चालू होतो. चला बघूया तर आता काय होतय ?

पो.पाटील : काय सरपंच, राजकारण कसं चाललंय.

सरपंच : काय नाय आमचं पद जात आलयं

पो.पाटील : कसं काय सरपंच ?

सरपंच : पाटील आपल्या गावात महिला आरक्षण पडलय, त्यामुळं आता कुठली तरी बायं सरपंच व्हणार.

पो.पाटील : मग आता कुणाला उभं करायचं हाय.

सरपंच : तोच इचार करतुया मी, आमची सरपंचकी जाणार.

पो.पाटील : आता काय करणार ?

सरपंच : मग करू की आपल्या जवळची कोणतरी उभं.

| | | |
|---|---|---|
| पो.पाटील | : | या विषयावर ग्रामपंचायतीत बोलू चला,<br>(सगळे ग्रामपंचायतीत जातात...) |
| राम्या | : | मी काय म्हणतो सायब असं करू, भीम्याच्या बायकोला उभी करू, ती लयं शिकलेली हाय. |
| पो.पाटील | : | गपै, राम्या, काय पणं कसं बुलतूयास? |
| भीम्या | : | राम्या, खुळबिळं झालयं का काय? माझ्या बायकुला न्हाय जमायचं राजकारण अन् मला पण ते न्हाय जुळायचं. |
| पो.पाटील | : | आवं सरपंच जरा इचार करा कशाला कोण शोधायचं सरपंचराव, तुमची बायकु उभी करा की, जर तुमची बायकु उभी किली तर पद आपल्याकडंच न्हाईल. कशाला दुसऱ्याला ते द्यायचं पद. |
| सरपंच | : | आरं, ती बरोबर हाय पण माझी बायकू इतकी शिकल्याली न्हाय ना? |
| पो.पाटील | : | आवं सरपंच तुमी त्याची कायबी काळजी करू नका. सगळं सेटींग मी करतो बगा. |
| सरपंच | : | काय व्हायचं नाय ना. |
| पोपटराव | : | आवं सायेब, पो. पाटील म्हणत्यात तेचं बरूबर हाय करू तुमची बायकू आरक्षण पण हाय स्त्रियांना. |
| पो.पाटील | : | मग लागूया तयारीला निवडणूकीच्या |
| सरपंच | : | आवं पाटील, समदं बरोबर हाय, पण समद्यांना विचारलं पाहिजे. |
| पोपटराव | : | आवं सरपंच, तुम्ही उभं राहिला तवा कुणाला इचारून उभं राहिला का? भरा मग अर्ज बायकुचा. |

पो.पाटील : सरपंच.... दया सगळा विचार सोडून. लागा तयारीला निवडणूकीच्या.

(वाद्य वाजतात, सरपंचाची बायको निवडूण येते पण तिचा नवरा माजी सरपंचाची मिरवणूक निघालेलीआहे)

निवेदक : निवडणूक झाली. सरपंचाची बायको निवडून आली. समाजाने समाजाचा विचार न करता राजकारणाला निवडून दिले.

हौसा : (सरपंचबाई आणि तिचा नवरा घरामधील प्रसंग) अवो धनी, समद झालं, इथून पुढं काय करायचं

सरपंच : अगं तू कायपण नको करूस, नुसत्या सह्या कर, बाकी मी बघतो.

हौसा : बरं, तुमी म्हणालं तीत सही करीन मी.

निवेदक : अशा तऱ्हेने अनेक पत्र सरपंच बाईंना येतात पण सरपंच ना कधी पूर्ण माहिती सांगत पण एक दिवशी सरपंच बाईना आलेले पहिले योजनेचे पत्र

हौसा : (घरचा प्रसंग) आवो धनी, सकाळी कसलं तरी पाकीट आल हाय.

सरपंच : बघु आण इकडं, अगं ही तर योजनेचं पाकीट हाय! आपल्या गावात नवी योजना सुरू करायची हाय त्याच हे पाकीट हाय.

हौसा : आव, कसली योजना हाय.

सरपंच : अगं तुला काय करायचचं तू फकस्त सही कर.

निवेदक : (अशी राजकारणाला भरपूर पत्र येतात. ना कधी सरपंच पूर्ण माहिती सांगतो योजनेची, ना हौसा कधी विचारते काय आहे ते पण त्या दिवशी त्या पत्रात तिने विचारलेच.)

| | | |
|---|---|---|
| हौसा | : | आवं धनी, कसलं पाकीट आलयां ती गौरी म्हणत व्हती की दारूचं काय तरी आलयं. |
| सरपंच | : | आगं, तुला काय करायचयं, तुला सांगितलया ते कर. |
| हौसा | : | मला काय हाय ते सांगा, तरचं सही करणार. |
| सरपंच | : | काय लय बोलतीयास गप कर सही. |
| हौसा | : | मला सांगितल्याशिवाय सही नाय करणार. |
| सरपंच | : | तुला ऐकायचच हाय तर मग ऐक. आपल्या गावात दारुबंदी करायची का नाय ते हाय आणि तू गप दारुबंदी नाय करायची तिथं सही करायची. |
| हौसा | : | मग तर मी सहीच करणार नाय तुमाला काय करायचयं ते करा. |
| सरपंच | : | हौसे, उगाच नाटक करू नकोस |
| हौसा | : | मला ते मान्य नाय म्या काय त्याच्यावर सही नाय करणार. (थोड्या वेळाने) |
| सरपंच | : | दारुबंदी व्हावी असं तुला वाटतयां? अग तुला कळना दारुबंदी झालीतर आपलं नुकसानचं हाय. |
| हौसा | : | आपलं कसलं नुकसान. |
| सरपंच | : | ते तुला माहीत नाय. |
| हौसा | : | आवो, पण जरा विचार करा दारुमुळं तर किती बायकांचं संसार उद्धवस्त झाल्यात. |
| सरपंच | : | तुला काय माहीत कुणाचा संसार उद्धस्त झालाय. सगळ्यांचा संसार दारुमुळं तर नीट चाललाय. |
| हौसा | : | हो! चंदू पैलवानाची पैलवान की दारुमुळं तर गेली ना आणि त्याच्या बायकुनं उगाचच जीव दिला काय. |

| | | |
|---|---|---|
| सरपंच | : | ते काय बी नाय दारुबंदी काय व्हायची नाय. |
| हौसा | : | मग म्याबी दारुबंदी करणारच. त्यासाठी मला काय कराय लागलं ते मी करणार. |
| सरपंच | : | हौसे, उगाचचं डोक्याचा कांदा करू नगस. (सरपंच रागाने निघून जातो.) |
| निवेदक | : | या सर्व गोष्टींचा विचार करून हौसा ग्रामपंचायतीत ग्रामसभा बोलावते.<br>(सभेचे दृश्य) |
| पो.पाटील | : | डायरेक सभा बोलावली सरपंच काय झालयं |
| सरपंच | : | तुमच्या गाढवपणामुळं म्या हौशीला सरपंच बनीवलं आता ती माझ्या नरड्यावर बसतीया. दारुबंदी कराय नीगाली. (सभा सुरू झाली.) |
| हौसा | : | म्या या गावची सरपंच या नात्यानं ग्रामसभा बोलवली हाय. ही सभा बोलवण्याचं कारण की, आपलया गावात दारुबंदी व्हावी म्हणून ठराव घ्यायचा आहे. |
| रम्या | : | अवो सरपंच बाई पण दारुबंदी म्हणजे गावातल्या काही माणसाचं जीव की प्राण |
| दारुडा | : | आता काय त्यासाठी तर मी तर असं म्हणतो,<br>शूर आम्ही पेदाढ, आम्हाला काय कुणाची भिती<br>गाडी, बंगला, पैशासाठी ग्लास घेतला हाती (सगळे त्याला बसवतात) |
| रम्या | : | आता अशाचं ओ काय ? |
| हौसा | : | अहो, रामभाऊ, तुम्ही तुमचा ईचार करताय. तुम्ही तुमच्या बायकापोरांचा ईचार नाय करत. तुमच्या दारुमुळं तीन टायमाचं आण तरी भेटतया का घरात. |
| गंगी | : | सरपंचबाय म्हणत्यात ते समदं बरोबर हाय. आमच्या संसाराची राखरांगोळी कराय दारुच जबाबदार हाय. म्या तुमच्यासंग हाय. |

हौसा : आपण दारुबंदी करायची हाय आण जर का ही दारुबंदी झाली नाय तर आपल्या गावातल्या प्रत्येक संसाराची राखरांगोळी होईल. आपल्या पुढच्या पिढीला जर का ही सवय लागली, तर गावाचा विकास अन् देशाचा विकास होणार नाय. गावाला गावपण राहणार नाय. गावातल्या प्रत्येक माणसावर भीक मागायची बारी ईल. जर का तुम्हाला ही सगळं पटत नसलं. तर म्या या सरपंचकीचा राजीनामा देते. आन् जर का तुम्हाला तुमचं भलं व्हावं असं वाटत असलं तर मग मला साथ द्या. आणि जर तुम्हाल हे मान्य नसेल तर मी माझ्या सरपंचकीचा राजीनामा देते (सर्व गोंधळतात हौसाचा नवरा उभा राहतो )

सरपंच : ये हौसा अगं काय चाललय,

गंगी : ओ माजी सरपंच ती हौसा तुमच्या घरी इथं सरपंचीन बाई हायत त्या (सगळे टाळ्या वाजवितात)

हौसा : चला तर मग लागा तयारीला (सगळे उठतात मतदानाचा प्रसंग, सगळे मतदान करतात व निकालाची वेळ येते)

निवडणूक अधिकारी : हे बघा आम्ही निकाल जाहिर करतोय, आडव्या बाटलीला पडलेत ५०२ मत उभ्या बाटलीला पडलेत ३ मत त्यामुळे विजयी झालेले आहेत आडवी बाटली (सगळे नाचतात, मिडीयावाले सरपंच बाईंची मुलाखत घेतात प्रसंग बदलतो)

निवेदक : गावकऱ्यांनी या सर्व गोष्टींचा विचार करून व आपल्या भल्यासाठी दारुबंदीची मशाल पेटवली. स्त्रीला भेटलेल्या आरक्षणामुळेच हे सिद्ध होऊ शकले.

हौसा : (घरातील प्रसंग हौसा आरशात बघून आवरती आहे मागून सरपंच येतो) धनी कशी दिसतीया मी

सरपंच : हौसा दिसायला तु लय झाक हाईस पण आजच्या पेपरात तुझे फोटो बघून वाटतयं की तु तुझ्या कतृत्वाने लय सुंदर दिसतीयास तु तर राजकारणात लय मोठी मझल मारलीस..

हौसा : धनी मी कुठं काय केलं फक्त लोकांच्या भल्याचं सकारात्मक राजकारण केलं (दोघेही हसतात)

***



‘लेक लाडकी अभियान’ सहर्ष सादर करीत आहोत पथनाट्य

# लहान मुलींना नवरी नका समजू

चल बाई चल झटपट चल । चटचट आता पाय उचल ।।
तुझा खेळ पहाया माणूस जमलं । खेळ बघता बघता ते बी रमलं ।।
चल बाई चल झटपट चल । चटचट आता पाय उचल ।।
कसं चालू बाई मी कसं चालू बाई । गावातला टग्या डोळं वासून पाही ।।
(हसतात) चल बाई चल .... । कसं चालू बाई मी कसं चालू बाई ।।
उसाची मोळी वाहून पाट दुखून येई । खरं हाय सोना, तुझं खरं हाय बरं...
बाई म्हणजे आयुष्यभर हाय मर मर... ।।

सगळे : हाय मर मर, हाय मर मर...

निवेदक : अरे अरे अरे काय मरणाच्या गोष्टी करताय, एवढं छान निसर्गानं आपणाला बाईच्या जन्माला घातलंय आणि तुम्ही मरणाच्या गोष्टी करताय !

सोना : मग, ओ ताई हायच अशी परिस्थिती. बाईचं जीवन म्हणजे पापच आणि या

पापातून मुक्त व्हायचं असंल तर मरेपर्यंत कष्ट करायचं.

निवेदक : अगं सोना, या निसर्गाचे आपण सगळे भाग आहोत, स्त्री आणि पुरुष अशी दोनच माणसं निसर्गाने घडवली, कोणीही कोणासाठी, पाप-पुण्याच्या भाग नाही, पण स्त्री आणि पुरुषामध्ये कायम स्त्रीला पुरुषाने खालचा दर्जा दिला आणि स्वत:ला श्रेष्ठ ठरवण्यासाठी तिला वेगवेगळ्या बंधनात कोंडलं आहे.

सविता : बंधन, कोणती बंधन ?

ताई : किती म्हणून सांगू ? या बंधनात तिला इतकं अडकवलंय की, तिला स्वत:ला आपला जन्म पाप वाटतोय. स्वत:च्या जन्मापासून मरेपर्यंत.

सगळे : जन्मापासून

ताई : हो, हो, जन्मापासून.

सीन बदल

(हौसेचा नवरा हौसेला बोलतोय.)

नवरा : हे बघ हौसा, आपण गरीब हाय. आयुष्य निघून जाईल, म्हातारं होऊ. मग कोण सांभाळणार आपल्याला? म्हणून सांगतो ते ऐक. आई बरोबर जा आणि पोटात पोरगा हायं का ते तपासून ये. जाऊ दे, काय पैसे जातील ते. मी घेतो मुकादमाकडून उसनं. पण तू तपासून ये.

हौसा : अहो, मी तुमाला सांगत होते. एवढी गरिबी हाय. ऊसतोड करणारी माणसं आपण. येवढी मुलं कशाला? पण ऐकतंय कोण ? अहो ऐका, कशाला तपासायचं. आता काय होईल ते होईल. एवढं होऊ द्यायचं अन् मुलं थांबवायचं

ऑपरेशन करायचं. त्या आशाताई ए. एन. एम. ताई सांगत होत्या.

नवरा : ए हौसा, लय बोलू नकोस. मिटींगला जावून लय बोलतीयस. नखरे बंद कर आणि गप्प तपासून ये आणि हो त्या मिटींगला जायचं नाय, सगळं बंद. मलाच अक्कल शिकवाया लागलीस. तुझी हुशारी फक्त चुलीपुरती... कळलं का ?....

सीन बदलतो

कमला : अहो, ताई ती कुट चुक बोलतं होती ? ती बरोबर बोलत होती.

ताई : हो, खरं आहे, पण बाईन बोलायचं नाय. बोलली तर अक्कल शिकवतेस, बाईच्या जातीनं लय बोलू नये, बाईनं पुरुषांच्या मध्ये नाक खुपसू नये, बाई लय चडिल हाय, असे शब्द वापरतात. हौसा बरोबर होती, पण तीच ऐकणार कोण?

रेखा : मग ताई, पुढं हौसाचं काय झालं? ती गेली का तपासायला?

ताई : घरातल्या कुटुंबासमोर तिचं काहीचं चाललं नाही. ती गेली बीडला तपासायला. डॉक्टरनं २०,००० रुपये घेतले, तपासलं आणि तिला परत मुलगीच होती. नवऱ्यानं, घरच्यांनी तिलाच दोष दिला. नवऱ्याचा मुलगी आहे म्हणून खाली करायचा विचार होता. पण पैसे जास्त लागत होते म्हणून ती पोटातली मुलगी वाचली आणि जन्माला आली.

सविता : चला, शिरूर कासारमध्ये एका मुलीची भर तर झाली नाहीतर अशा मुलगा-मुलगी तपासून शिरूरमध्ये मुलींची संख्या कमी झालीये.

ताई : हो, पण हौसाला मनातनं लय आनंद झाला. कोणत्याही आईला जगात आपलं लेकरु प्रिय असतं. मग तो पोरगा असूदे नायतर पोरगी.

सविता : खरं आहे तिला काय दोन्ही लेकरंच. पण ताई पुढे काय झालं?

ताई : पुढं त्या मुलीचं नाव ठेवला सावित्री. सावित्री शाळेत हुशार होती.

सीन बदलतो.

(शाळेतला सीन)

गुरुजी : हा तर मुलांनो, आज आपल्या शाळेत पाहुणे आलेले आहेत. ते आपली शाळा तपासायला आले आहेत, तर त्यांचे जोरदार टाळ्यांनी स्वागत करा. (सगळे टाळ्या वाजवतात.)

पाहुणे : हा तर बालमित्रांनो, मी आज शाळा तपासायला आलो आहे. शाळा तपासणी म्हणजे त्याची इमारत, शिक्षक नव्हे तर शिक्षणाचा प्रभाव मुलांवर पडतो की नाही, मुले शिक्षण आत्मसात करतात की नाही, मुलांना शिकवलेले समजते की नाही ? (एका मुलीकडे बोट दाखवत)

ए बाळा, तू ऊठ जरा, (ते सावित्रीला उठवतात.) सांग बरं बर्फ किती डिग्रीला होतो ?

सावित्री : झिरो डिग्रीला.

पाहुणे : शाब्बास हुशार आहेस. गुड, मला सांगा तुला पुढं मोठं होऊन कोण व्हायचंय?

सावित्री : कलेक्टर

पाहुणे : अरे व्वा, छान ! पण का गं तुला कलेक्टर का व्हायचंय?

सावित्री : माझ्या आई आणि बा साठी.

| | | |
|---|---|---|
| पाहुणे | : | वा ! वा ! काय करतात आई-वडिल ? |
| सावित्री | : | ऊसतोडीला जात्यात. कोयता हातात धरून धरून त्यांच्या हाताला फोड येत्यात. मी रात्री त्यांच्या हाताला तेल लावते. आईला डोक्याला पण लावते. ऊसाची मोळी वाहून वाहून डोळे दुखतात. मीच परवा ऊसतोडीला गेले होते. तेव्हा आमच्या झोपडीला आग लागली. ती विझवताना आईच्या हाताला भाजलं. बा चे कपडे जळाले. त्यात बा चे उचल घेतलेले पैसे होते. आई लय रडत होती, मी बी रडली, मोठी झाली ना की माझ्या आई अन् बा साठी घर बांधणार अन् त्यांना ऊसतोडीला नाय जाऊ देणार. म्हणून मी कलेक्टर होणार. (पाहुणे जाऊन तिला मिठी मारतात. सगळे टाळ्या वाजवतात.) |
| ताई | : | सावित्रीनं शिक्षणात कमाल केली. तिच्यामुळे शाळेचं नाव तालुका, मग जिल्हा अगदी राज्य पातळीवर झळकलं. |

सीन बदलतो.

(सावित्री पळत पळत येते. आईला मिठी मारते.)

| | | |
|---|---|---|
| सावित्री | : | आई...... |
| आई | : | अगं....अगं.... काय झालं एवढं ? |
| सावित्री | | आई माझा सत्कार होणार आहे. मी जिल्ह्यात पहिली आले. |
| आई | : | कशात ? |
| सावित्री | : | अभ्यासात .... (वडिल येतात.) बा माझा सत्कार हाय. मी जिल्ह्यात पहिली |

आले.

वडिल : बरं... बरं.... (सावित्री पळत जाते. बाप तिच्याकडे बघत) हौसा, काय वय असंल सावित्रीचं ?

हौसा : आता ती आठवीला हाय, असंल १३-१४. का हो आज एकदम पोरीचं वय विचारताय ?

वडिल : हौसा, पोरगी वाढत्या वयाची झाली की बापाची काळजी वाढती (निघून जातो. हौसा बघत बसते.)

गुरूजी : हे बघा शिकवल्यानंतर दिलेला गृहपाठ दुसऱ्या दिवशी शाळेत आणायचा. उगाच शाळेत येऊन कारण सांगायची नाहीत. वहीच विसरली वगैरे. कळलं का आणि रोज शाळेत येणे चुकवू नका. ती सावित्री बघा. तिच्याकडून शिका. कुठे आहे सावित्री ...

मैत्रिण : सर, ती दोन दिवस झाले आले नाही आणि मी विचारायला गेले तर तिचे वडिल म्हणाले की, ती कधीच येणार नाही म्हणून.

गुरूजी : काय ? का ?

मैत्रिण : तिला बघायला मुलगा येणार आहे. तीचं लगीन ठरवत आहेत तिचे वडिल. (सगळी मुलं 'काय')

(शिक्षक तिच्या वडिलांकडे जातात, घरी लग्नाची बैठक चालू आहे)

मुलाचे वडिल : हे बघा, श्रीपती माझा मुलगा नाशिकच्या कंपनीत कामाला आहे, पोरीला सुखात ठेवलं.

मुलीचे वडिल : हो पण हुंड्याचं काय ?

मुलाचे वडिल : हे बघा, १ लाख रु. आणि ३ तोळे सोने आणि लगीन लावून द्यायचं. (शिक्षक प्रवेश करतात. सोबत एक माणूस)

शिक्षक : सावित्री, ए सावित्री. (सावित्री उठून उभी राहते.)

मुलीचे वडिल : अरे सर, या चांगल्या टाइमाला आलात. काय काढलंत.

शिक्षक : काय नाय, जरा तुमचं ते लहान वासरू हाय ना ते पायजे व्हतं.

मुलीचे वडिल : ते खोड व्हयं, का कशासाठी? का शाळा सोडून शेती करणार का? (सगळे हसतात.)

गुरुजी : हो, जरा पाऊस पडला हाय म्हणाल शेत जरा नांगरून द्यावं म्हणून तुमचं वासरू पायजेल व्हतं. म्हणजी कसं आमचा बैल हाय, तुमचं वासरू आणि ते ऊसतोडीला जातात. बैलजोडी पण होईल ना.

मुलाचे वडिल : ओ गुरुजी, खुळं बिळ झाला आहे काय ? बारक्या खोंडाला कुठं बैल जोडतात व्हयं. समान नको का. आव गाडी वडलं का ?

गुरुजी : काय ओ का नाय जुळणार ? तुमच्या या मोठ्या बैलाला हे खोंड चालू शकतं तर मग इथं का नाय चालणार?

मुलाचे वडिल : गुरुजी तोंड सांभाळून बोला.

गुरुजी : का हो राग आला. जनावराचं कळतं. शेतात कापसाच्या बारक्या रोपट्याला

जपता, त्याला पाणी घालता, खत घालता, काळजी घेता, त्याचं कळतं, मग माणसाचं नाय समजत (सावित्रीच्या डोक्यावरून हात फिरवत) आरं लेकरू हाय रं ते. लहान रोपटचं हाय.

मुलीचे वडिल : नाय सांभाळू शकत. पोरगी मोठी झाली की, बापाची काळजी वाढते. ऊस तोडीला जावं लागतं. तिला इथं गावाकडं आजीसोबत ठेवायला भीती वाटते. कोण काय केलं तर ?

गुरूजी : म्हणून आधी तिची वाट लावताय १४ व्या वर्षी लग्न, १५ व्या वर्षी पदरात पोरं. झाली १५ वर्षाची आई, अरे तिच एक बाळ असताना तिच्या पदरात एक बाळ देता तुम्ही. आरं, नवरा बायकोच नातं तरी तिला नीट माहिती असतं का? अरे, स्त्री-पुरुष संबंध म्हणजे ते काय तिला माहिती असते का? (सगळे माना खाली घालतात.)

सीन बदलतो.

निवेदक (ताई) प्रवेश करते.

निवेदक ताई

१. मंडळी, लहान वयातील मुलीच्या लग्नामुळे लहान वयातील मुलींचे बाळंतपण आणि गरोदरपण यामुळे १५ ते १९ वयोगटातील मुलींचे मृत्यू होताहेत. रूढी व परंपरा यांच्या नावाखाली आपण मुलींच्या आयुष्याशी खेळतो आहोत.

२. घरातल्या कुत्र्यांना, शेळीला, बैलाला, मांजरांना सांभाळतो मग पोटच्या लेकींना का नाही.
३. मुलींना परक्याचं धन समजू नका.
४. तिला शिक्षण आणि आरोग्याचा हक्क द्या.
५. आपण जर काहीच केले नाही तर २०३० सालापर्यंत दरवर्षी दीड कोटी मुलींची लग्न बालवयात होतील आणि मग असा समाज निर्माण होईल जो कुपोषित आणि आजारी असेल.
६. लहानपण, लहापण जे कधीच परत येणार नाही तिच्या आयुष्यात. म्हणून तिला वाचवा आणि तिला शिकवा...
७. मुलींना ओझे समजू नका.

सगळे : लक्षात ठेवा, लहान वयात मुलींचे लग्न करणे कायद्याने दखलपात्र गुन्हा आहे, तसे केल्यास २ वर्षे कारावासाची शिक्षा आहे.

निवेदक : लक्षात ठेवा, मुलीला नवरी नका समजू.

सगळे : मुलींना नवरी नका समजू.

***



# समतेची कास धरु
# ग्रामसभा सक्षम करु

हाटी हाटीच्या आया बायांनो । ग्रामसभेला या या ।।
शेतामंदी राबणाऱ्या बाया । ग्रामसभेला या या ।।
घरामंदी राबणाऱ्या बाया । ग्रामसभेला या या ।।
तुम्ही ग्रामसभेला या या । ग्रामसभेला या या ।।
विचारांचा जागर मांडला । जागराला या या ।।
जागराला या या, जागराला या या ।।

म्हातारी : ऐ पोरींनो, कुठल्या देवीचा जागर मांडलाय ?
निवेदक : अहो आजी, ह्यो जागर देवीचा नाय.
म्हातारी : मग काय खंडेरायाचा हाय ?
निवेदक : कुठल्याही देवाचा नाही.
म्हातारी : मग काय हाय ?
निवेदक : ह्यो जागरच आहे. हा जागर आहे समतेचा. हा जागर आहे आपल्या देशाचा.
एक बाई : म्हंजे आपल्या गावाच्या देवाच्या यात्रेत जागर असतो तसा...
दुसरी बाई : गावाची यात्रा तसं देशाची यात्रा
निवेदक : अरे हो हो हो, ही यात्राच आहे. देशाची यात्रा, आनंदाचा दिवस

| | | |
|---|---|---|
| सगळे | : | अहो, पण कोणाला? नाव काय ? |
| निवेदक | : | ही आहे प्रजासत्ताक देवाची. |
| सगळे | : | प्रजासत्ताक देव. हा कुठला देव ? |
| निवेदक | : | या प्रजासत्ताक देवामुळं आपण बोलतो, वावरतो, सर्वत्र संचार करतो, ते या देवामुळे. |
| तिसरी बाई | : | एवढा पावरफुल देव हाय. |
| निवेदक | : | हो पावरफुल्ल देव हाय. पण ही पावर दिसत नाय. ती फक्त जानवते. |
| चौथी बाई | : | अहो, पण असते कधी यात्रा ? |
| निवेदक | : | २६ जानेवारीला याची यात्रा असते. त्यात लहानांपासून तर मोठ्यापर्यंत सगळे झेंडा फडकवून सलामी देतान ना! |
| पाचवी बाई | : | झेंड्याला सलामी तर १५ ऑगस्टला पण देतात ना ! |
| निवेदक | : | तो स्वातंत्र्य दिवस. त्या दिवशी ब्रिटिशांना हाकलून आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळाले आणि २६ जानेवारी १९४९ रोजी आपला देश कसा चालावा, कुणी चालवावा याचे नियम घातले गेले. पुस्तक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहून या दिवशी देशाला अर्पण केले. तो हा दिवस म्हणजे २६ जानेवारी. |
| सहावी बाई | : | बरं मग आमचा काय संबंध याच्याशी ? |
| निवेदक | : | अग, या राज्यघटनेमुळेच आपल्याला मताचा अधिकार मिळाला.<br>टाटा, बिर्ला, अंबानी यांनी एकमत आणि गरीबातल्या गरीबालाही एक मत आणि या घटनेमुळेच आपल्या मताचा अधिकार मिळाला. |

सातवी बाई : बरं पण याचा आज काय संबध ?

निवेदक : २६ जानेवारीला जी महत्वाची ग्रामसभा होते, त्याच्या आदल्या दिवशी म्हणजे २५ तारखेला फक्त महिलांची ग्रामसभा होते आणि या सभेत महिलांच्या अनुषंगाने वेगवेगळे विषय सभेत घेतले जातात व त्यानुसार ग्रामपंचायतीने काम करणे भाग पडते म्हणून आपण ग्रामसभेला यायचं.

आठवी बाई : अगं, पण आम्ही कधीच जात नाय. आमच्या गावात चालत नाय बायांनी असं चावडीवर यायचं.

(सीन बदलतो)

सरपंचाचा प्रवेश

आश्विनी : सरपंच ओ ऽ ऽ सरपंच.

सरपंच : काय ओ ताई, काय म्हणता ?

आश्विनी : अहो सरपंच, २५ तारखेला महिलांची ग्रामसभा हाय म्हणतात.

सरपंच : त्या आशाताई म्हणत होत्या, २५ तारखेला फक्त महिलांची विशेष ग्रामसभा हाय म्हणून.

हाय ना ओ ग्रामसभा सगळ्या महिला येणार हाय.

सरपंच : अरे देवा, मी तुम्हाला सांगायलाच विसरलो. या या ग्रामसभेला. (आश्विनी जाते.) (सरपंच ग्रामसेवकाला बोलावतो.)

सरपंच : ओ ग्रामसेवक साहेब, ओ आण्णासाहेब.

| | | |
|---|---|---|
| ग्रामसेवक | : | काय झालं सरपंच साहेब? |
| सरपंच | : | काय हो चाललं हे २५ तारखेला. महिलांची ग्रामसभा हाय म्हणं. |
| ग्रामसेवक | : | अहो, गावात बॅनर लागलेत. महिलांनी ग्रामसभेला यावं म्हणून. |
| सरपंच | : | आता हो, आता काय करायचं ? आता महिलांना घ्यावचं लागल. मला वाटतं व्हाय यायच्या ! |
| ग्रामसेवक | : | आल्या तर ? |
| सरपंच | : | समजा आल्या तर सह्या आणि अंगठे घ्यायचे आणि चहा पाणी करायचं. मग झालं. |

(सीन बदलता)

ग्रामसभेचा सीन

| | | |
|---|---|---|
| सरपंच | : | हे बघा, आजच्या या महिला ग्रामसभेला उपस्थित राहिलात याबद्दल तुमचे सर्वांचे धन्यवाद ! ;<br>तुम्हाला काय बोलायचं ते बोला. |
| १ बाई | : | सरपंच आत्तापर्यंत आम्हा बायांसाठी तुम्ही काय पण केलं व्हायं. |
| सरपंच | : | अहो मावशी, असं कसं म्हणता. आता मी गावाला रस्ता, गटर, आपल्या देवाच्या मंदिराचं काम पूर्ण करणार हाय. हा काय विकास व्हाय. |
| २ बाई | : | वो सरपंच, आम्हां महिलांसाठी विशेष काय केलं ते सांगा. |
| ३ बाई | : | गटर, रस्ता म्हणजे विकास व्हाय. आम्हांसाठी काय केलं ते सांगा. |
| ४ बाई | : | आपल्या गावात अंगणवाडीत बसायला जागा व्हाय. बारक्या पोरांची बसायला हाल होतात. |

निवेदक : सरपंच, ग्रामसेवक पुरुषांच्या जशा गरजा आहेत तशा बायकांच्यापण आहेत. गावातली परिस्थिती आणि महिलांकडे पाहण्याचा दृष्टिकोन असा बनवा की, प्रत्येक बाईला गावात सुरक्षित वाटलं पाहिजे.

सरपंच : खरं आहे तुमचं, गावाचा विकास म्हणजे सिमेंट, वाळू, दगड, विटा नव्हे तर गावचा विकास माणसामाणसात झाला पाहिजे. या विकासात महिलांनाही सोबत घेतलं पाहिजे. म्हणून आज या ग्रामसभेत असा ठराव करण्यात येतो की, रस्ते मंदिर नंतर. आधी महिलांसाठी शौचालयाची व्यवस्था आम्ही करणार आहोत असा ठराव ही ग्रामपंचायत घेते.

आपल्या गावात सगळ्या मुली शाळेत गेल्या पाहिजेत. असाही ठराव ग्रामपंचायत करीत आहेत. आपल्या गावात एकाही पोरीचा बालविवाह होणार नाही असाही ठराव ग्रामपंचायत करीत आहे.

(सगळे टाळ्या वाजवतात.) (निवेदक प्रवेश करतो.)

निवेदक : अशातऱ्हेने या ग्रामपंचायतीची आदर्श ग्रामपंचायत म्हणून निवड झाली आहे. सर्व महिलांना सांगण्यात येते की, सर्वांनी गावच्या ग्रामसभेला नेहमी उपस्थित राहून आपली मते नोंदविणे व महिलांसाठी असणाऱ्या विविध योजनांची चर्चा करणे गरजेचे आहे. ग्रामसभेत उपस्थित रहाणे हा आपला अधिकार आहे.

सर्वजण : समतेची कास धरु ग्रामसभा सक्षम करु.(घोषणा देतात)

***





# स्पर्श (लघुनाटिका)

निवेदक : मित्रांनो नमस्कार, आज खरच एका वेगळ्या विचाराने आपण प्रेरित होऊन समानता प्रस्थापित करण्यासाठी एकत्र जमलो आहोत. समानता, गर्भातल्या मुलीपासून ते म्हाताऱ्या बाईपर्यंत व जन्मभर. दिल्लीतील निर्भयाच्या प्रकरणानंतर भारतात महिलांची सुरक्षितता हा मोठा प्रश्न बनला. सामुहिक बलात्कारासारख्या घटना घडू लागल्या आणि लहान लहान मुलींवरही सामुहिक बलात्कारासारख्या घटना घडू लागल्या आणि भारत स्त्रियांसाठी असुरक्षित बनला म्हणून घरातल्या, नात्यातल्या माणसांपासून ते अनोळखी माणसांपर्यंत..

(घरातला सीन, लहान मुलगी खेळती आहे, आई स्वयंपाक घरात आहे. बेल वाजते आई आतून छकुलीला दरवाजा उघडायला लावते. छकुली दार उघडते दारात एक पुरुष असतो.)

पुरुष : आहेत का बाबा?

छकुली : नाही बाबा ऑफिसला गेलेत.

आई : (बाहेर येत) कोण आहे छकुली? अरे अहिरे साहेब या... या... बसा बसा पाणी आणते. (पाणी आणायला आत जाते.)

अहिरे : ह... काय करतीऐस छकुली.

छकुली : खेळतीये

अहिरे : बर ... बर... (आई येते पाणी देते)

आई : हे ऑफिसला गेलेत.

अहिरे : हो का आरे आरे बर मी उद्या येतो.

आई : नाही नाही बसा की चहा करते. (चहा करायला आत जाते.)

अहिरे : (मुलीच्या जवळ येवून बसतो.) काय खेळ चाललाय? (छकुली जरा सरकून बसते.) भांडी कुंडी. छान छान (जवळ येवून खांद्यावर हात ठेवले) (छकुली खांदयवरचा हात झटकते व सावरून बसते.) आम्हालाही घ्या की तुमच्या खेळात. छकुली वा वा तुझे केस किती सुंदर आहेत. (हात फि रवतो, ती घाबरते) तुझे गाल (हात लावायला जातो, ती ओरडते व आत आई म्हणून पळते आई. आतून बाहेर येते चहा घेवून)

आई : आगं... आगं हो हो हो हळू चहा सांडेल. (ती आत पळून जाते. अहिरे जरा बावचळतात.) घ्या चहा घ्या.

अहिरे : भलतीच गोड आहे हो तुमची मुलगी.

आई : अं... हो... (अहिरे चहा घेतात.)

अहिरे : बरं आहे, मी येतो उद्या.

आई : हो हो या. (अहिरे जातात छकुली बाहेर येते आईपाशी येते हाताला धरते.)

छकुली : आई... आई...ते...ते...

आई : अगं काका आहेत ते बाबांच्या ओळखीचे.



छकुली : ते मला हात लावत होते. केसांवरून हात फि रवला त्यांनी.

आई : हो... हो... मला म्हणाले भलतीच गोड आहे हो तुमची मुलगी.

छकुली : पण आई.

आई : चल मला काम आहेत स्वयंपाक करायचाय.

(छकुली एकटी आहे आई निघुन जाते स्वयंपाक घरात छकुली शेजारी असल्याने बाहुली हातात धरते व अहिरे काकांप्रमाणे तिला हात लावतात दुसऱ्या हाताने बाहुली लांब घेते पुन्हा हात लावतात हा सगळा मुक अभिनय करणे शेवटी ती बाहुली फेकते तेवढ्यात आई येते व बघते.)

आई : (ओरडून) छकुली ऽऽऽ ( छकुली पळत जाऊन आईला मिठी मारते व रडते)

छकुली : आई ते काका मला त्रास देतात, कुठेही हात लावतात

आई : छकुली ऐ छकुली सॉरी बेटा मीच दुर्लक्ष केल पण आता नाही आता येऊदे त्या आहिरेला (छकुली हासते)

निवेदक : बघितलत छोट्या छोट्या लहान मुलांच्या गोष्टींकडे आपण किती दुर्लक्ष करतो त्या छकुलीला तो स्पर्श जाणवला तिने आईलाही सांगितला. पण आईने दुर्लक्ष केले. प्रत्येक गोष्टीकडे आता डोळसपणे बघण्याची वेळ आली आहे. अगदी जवळच्या नातेवाईकांपासून ओळखीच्यांपर्यंत...

***


Challenge Patriarchy
Promoting Gender Equality

# विटाळ

जय जय जय ऋणेश्वरा स्वामी जय जय जय ऋणेश्वरा
हम सबके तुम स्वामी।।१।।
(एकजण मराठीत बोलतो.)

सेवा करतो आम्ही बोलो जय जय जय स्वामी. तुमने कभी इस जगमे द्वेष ना सिखाया, स्वामी द्वेष ना सिखाया. स्त्रि तथा पुरुषोंके संग।।२।। भेदभाव ना सिखाया बोलो जय जय जय ऋणेश्वरा (आवाज वाढत जातो भटजी येतात.)

भटजी : जय ऋणेश्वरा (सगळे) जय ऋणेश्वरा.

भटजी : भगतो युगोयुगोंसे हम स्वामी ऋणेश्वर की भक्ती में दंग है, मग्न है। आज भी हम स्वामी ने दिये हुये ग्यान के रस्ते पे चल रहे है। किसी का द्वेश ना करे, स्त्री तथा पुरुष समान है। नाकी कोई इनमे बलवान है। इस संदेश को पालते हुए मन मे लिये आप सब लोग यहाँपे आए है। प्रभु के दर्शन लेने हो तो भक्तो दर्शन ले नेके लीये एक लाईनसे आइये। (सगळे एक लाईन करतात. उभे राहतात.)

भटजी२ : अरे यक्या सब एक साथ मैं? हटीये, पुरुषोंकी लाईन अलग महिलाओंकी लाईन अलग. चलीये चलीये लाईन कीजिए। (सगळे दोन लाईन करतात गोंधोळ होतो भटजी गाणं सुरू करतो.) जय जय जय ऋणेश्वरा स्वामी जय जय जय ऋणेश्वरा. (सगळे मागे म्हणत म्हणत लाइन करतात. एक एक आत जातो. वर बघतो जय ऋणेश्वरा पुढचा येतो जय ऋणेश्वरा पुरुषाची लाईन सुरू राहते. महिला गोंधळ करतात भटजी गाणं सुरू करतात.)

जय जय जय ऋणेश्वरा. (पुरुषाची लाईन संपते महिलांची सुरू होते. महिलांच्या रांगेसमोर हातांचा चौकोन धरून मांडव केला हातांचा तसे दोन पुरुष उभे राहतात एक महिला आत जाते दर्शन घेते.)

महिला : जय स्वामी ऋणेश्वरा (सगळे जय स्वामी ऋणेश्वरा म्हणतात. दुसरी महिला जाते दर्शन घेते. तिसरी जाते दर्शन घेते. चौथी जाते आणि मांडव धरलेल पुरुष टॅव टॅव टॅव असे ओरडतात. भटजी पळत येतात.)

भटजी १ : रुक जाव वहिपे आगे मत आना (जोरात ओरडतो. सगळे गोळा होतात.)

सगळे : काय झाले, काय झाले?

भटजी २ : वहिपे रुक अपवित्र नारी (बाई गोंधळते)

भटजी १ : तुम्हारी जुर्रत कैसे हुई मंदिर के अंदर पाव रखनेकी.

भटजी ३ : अब मंदिर तो अपवित्र हुआ.

भटजी २ : हमे मालूम था की मासिक पाळी के दरम्यान कोई महिला आ के दर्शन करेगी और स्वामी ऋणेश्वर के मंदिर और गाभारे को भ्रष्ट करेगी.

भटजी ३ : इसलिये हमने ये मशीन लगाया ताकी हमे समझे की कौन कौन महिला मासिक पाळी के दरम्यान मंदिर मे प्रवेश कर रही है। (चॅनेल वाला प्रवेश करतो व शुटींग करतो.)

भटजी १ : बोलो बोलो है ना मासिक पाळी शुरू ? बोलो, है ना मासिक पाळी शुरू ? (सगळे पुरुष मागे म्हणतात.)

बाई : (जोरात ओरडते) गप्प बसा. लाजा नाय वाटत बाईच्या पाळीच्या चर्चा करता. बाईची पाळी म्हणजे विटाळ का? तुमच्या आयांना पाळी आली म्हणूनच तुमचे जन्म झाले ना.

सगळे भटजी : ऐ अरे चूप औरत (सगळे अंगावर येतात) (त्यातल्या एकाच्या ती थोबाडीत मारते मग सगळे मागे सरकतात.)

बाई : पाळी म्हणजे विटाळ का? पाळी म्हणजे काय ते तरी माहिती आहे का? आणि पाळीची

चर्चा करताय. पाळी म्हणजे दर महिन्याला मूल जन्माला घालण्यासाठी गर्भाशय तयार होते. सगळी तयारी करते आणि जर स्त्रीयांचे आणि पुरुषांचे बिजाचे मिलन नाही झाले तर ते अंडाशय फुटते त्यातून रक्ताच्या गाठी बाहेर पडतात. रक्ताच्या पाट वाहतो. योनीमार्गातून....

सगळे : बंद करा. बंद करा हे बोलणे.

बाई२ : अरे वा बाईच्या पाळी विषयी जाहिरपणे चर्चा करताना लाज नाही वाटली तर बाईची पाळी कशी येते हे ऐकायची लाज का वाटते?

बाई ३ : बाईची पाळी म्हणजे पुरुषाची निर्मिती आहे. ज्या दिवशी ही निर्मिती संपेल तेव्हा पुरुषाचा जन्मही संपेल. निसर्गाच्या निर्मितीतला एक महत्त्वाचा भाग बाई. ती निर्मिती आहे. सृष्टीची ती निर्मिती आहे...

बाई : सगळी व्रत, वैकल्य, जप, धर्म याचे ठेकेदार पुरुष आणि सांभाळणाऱ्या बायका आणि हो ओ धर्माचे ठेकेदार (भटजींना) या ऋणेश्वराने समानतेने रहा असे सांगितले आहे. भजन म्हणतात ना त्यांचे आणि काय हो या ऋणेश्वराच्या आईला पण पाळी आली असेलचना म्हणून तर त्यांचा जन्म झाला. (सगळे भटजी गडबडतात.) ऐ चला गं देवाच्या दर्शनाला सगळे जातात. (चॅनेलवाला व कॅमेरामन पण)

चॅनेलवाला : आपण बघितले की कशाप्रमाणे महिला बंड करतात पण जिथे जिथे अशाप्रकारे महिलांना नाकराले जाते त्यांच्या मूलभूत हक्कांपासून दूर ठेवले जाते. काही मंदिरांच्या बाहेर महिलांना गाभाऱ्यात प्रवेश नाही. असे बोर्ड दिसतात. आपण नक्की काय साधतोय. एका धर्म निरपेक्ष समाजाची स्थापना की धर्मावर आधारलेली, स्त्रियांना आणि कमकुवतांना दाबून टाकणारी व्यवस्था. जी फक्त मूठभर श्रीमंतांच्या व वरच्या जातीतल्या लोकांच्या हातात आहे. निर्णय आपणच करायचा आहे. चला तर मग आपण आपल्या घरापासूनच सुरुवात करुयात. कॅमेरामन संतोषसह मी कुमार यादव. समता चॅनल...

***


भारती

# शोध समतेचा

(विक्रम वेतालाला शोधतोय राजा विक्रम स्टेजवर प्रवेश करतोय. विंगेत जातो वेतालाला पाठीवर ठेवतो व चालतो.)

वेताळ : राजा मला माहितीये तु बोलणार नाहीस कारण तू बोललास तर मी परत झाडावर जाईन. काय म्हणतोस? (विक्रम फक्त हसतो बोलत नाही.) हमम् म्हणजे तू बोलणार नाहीस. तू बोलला नाहीस तर रस्ता उरकणार कसा? (राजा परत वेतालाकडे बघून हसतो.) बर बाबा नको बोलूस चल मी तुला एक गोष्ट सांगतो. चालेल? म्हणजे तुला कंटाळा येणार नाही. (राजा मान हालवतो.) राजा, एक आटपाटनगर होत. त्या नगरीचा एक राजा होता. त्याचा एक प्रधानजी होता एक दिवशी राजदरबारात एक साधू येतो. (सीन बदलतो, राजाचा महाल, साधू प्रवेश करतो सोबत प्रधानजी)

साधू : अरे वा...वा...वा... प्रधानजी तुमच्या राजाचा राजवाडा तर सुंदरच आहे. वा...वा...वा... अतिसुंदर.

प्रधान : साधुजी आमचे महाराज एकदम दिलदार आहेत. पण जरा भोळे आहेत मनान. एकदम कोणाच्याही बोलण्याने पाघळणार.

साधू : बर... बर... (महाराज प्रवेश करतात.)

प्रधान : महाराजांचा विजय असो.

महाराज : (साधूंच्या पाया पडत) या या साधुजी या आमच्या महालात तुमचे पाय लागले या... या...या...

साधू : आम्हालाही आपणाला भेटून बरे वाटले.

| | |
|---|---|
| प्रधान | : अहो महाराज हे साधुजी निघालेच होते. पण म्हणालो जरा चला आमच्या महाराजांना तुम्हाला भेटायचे आहे आणि मग घेवून आलो. |
| महाराज | : वा...वा...वा... या साधुजी बसा (साधू बसतो.) कसे वाटले आमचे राज्य ? |
| साधू | : अतिउत्तम मला आवडले आपले राज्य पण. |
| महाराज | : पण, पण काय ? |
| प्रधान | : कोणी त्रास दिला का आपल्याला ? |
| साधू | : नाही, नाही. त्रास नाही. पण मला आपल्या राज्यात समतेचा अभाव वाटला. छान असून भागत नाही. समता-बंधूता हवीच. त्याशिवाय राज्य उन्नत कसे होणार? हे राजा राज्यकारभार करताना नेहमी या गोष्टीच भान ठेव व प्रजेलाही समता-बंधूता जपायला सांग. म्हणजेच तुझे राज्य खऱ्या अर्थाने समतावादी होईल. फक्त इमारतींचा विकास नको. बर आहे राजा मला निघायला हवे. पुढे जायचे आहे. |
| महाराज | : अस कस महाराज जरा भोजन करून जा. |
| प्रधान | : जरा विश्रांती घेवून जा. |
| साधू | : नाही राजा मी फक्त एकदाच सकाळी एक फळ खातो. बाकी काही नाही. बर आहे राजा. कल्याण होवू दे. (साधू जातो.) |
| महाराज | : प्रधानजी बर झालं साधूंना तू घेवून आलास. बर वाटलं त्यांना भेटून. |
| प्रधान | : मलासुद्धा समाधान वाटले महाराज. |
| महाराज | : पण प्रधानजी आपण इतके दिवस राज्यकारभार चालवतोय. सगळीकडे आनंदी आनंद आहे पणहे साधू अस कसं म्हणाले. |
| प्रधान | : काय महाराज. |
| महाराज | : समतेचा अभाव आहे महणून. इतके दिवस राज्यकारभार करतोय पण ही समता कुठे दिसली नाही आणि कधी भेटलीही नाही. कोण आहे ही समता. |

प्रधान : हो महाराज मला पण कळलं नाही यांना कुठे भेटली असेल?

महाराज : नाही नाही साधुंनी सांगितलं म्हटल्यावर तिला कुठुनपण आणलीच पाहिजे.

प्रधान : पण महाराज ती कुठे राहती, कशी आहे, कुणाची आहे, तिचे आई-बाप कोण आहेत याचा शोध नको घ्यायला.

महाराज : अहो पण समता भेटायला पाहिजे तेवढीच खंत साधुंनी सांगितली आहे. (टाळी वाजवतो) कोण आहे रे तिकडे (शिपाई येतो.)

शिपाई : महाराजांचा विजय असो.

महाराज : शिपाई डोळ्यात तेल घालून राज्यावर लक्ष ठेवा. आपल्या राज्यात समता नाही याच दुःख व्यक्त केलं साधुंनी. नीट लक्ष ठेवा आणि ती भेटताच तिला आमच्या दरबारात घेवून या.

शिपाई : हो महाराज, पण ती कशी हाय. काळी, सावळी, गोरी, उंची कशी हाय महाराज.

प्रधान : महाराजांच्या ओळखीची हाय! अरे मुर्खा हे सगळं माहिती असतं तर मीच नाहि का... (महाराज ओरडतात) इथ आणली असती.

शिपाई : बर बर बघतो. महाराजांचा विजय असो (जातो.)

प्रधान : पण महाराज ते साधु असं म्हणले नाहीत की ती कोणीतरी समता नावाची बाईमाणूस आहे म्हणून.

महाराज : खरच की प्रधानजी आपण हे लक्षातच घेतलं नाही. कोण असेल, कशी असेल. (डोयाला हात लावून बसतो, तेवढ्यात एक आवाज येतो. भाजी घ्या भाजी, गवार, पोकळा. प्रधानजी ती भाजीतर नसेल?)

प्रधान : काही सांगता येत नाही.

महाराज : प्रधानजी बोलवा तिला.

प्रधान : (बोलवतो. डोयावर पाटी घेऊन ती बाई येते.)

बाई : महाराजांचा विजय असो.

महाराज : असो...असो... बर काय काय आहे तुझ्याकडं?

बाई : गवार, पोकळा, भोपळा, टोमॅटो

महाराज : बास आणि काय नाही?

बाई : आणि काय पाहिजे महाराज.

महाराज : ते समता आहे का?

बाई : काय महाराज

प्रधान : स-म-ता

बाई : हासते. समता हे काय हाय? ड्ब ळ हाय का? पालेभाजी हाय? कशी हाय. त्याची चव गोड, तिखट, आंबट...??

महाराज : प्रधानजी अहो काय हे...

प्रधान : बर अशी कोणतीच भाजी नसते का? समता नावाची.

महाराज : बाई या तुम्ही बाई माणसाच्या तोंडाला लागू नये म्हणतात तेच खरं.

बाई : ओ महाराज तस तर बाई अजून काय बी बोलली नाय. जर ती बोलली ना तर घरातल्या पुरुषांपासूनते रस्त्यातल्या माणसापर्यंत सगळ्यांची पळता भुई थोडी होईल.

प्रधान : ए भाजीवाली तोंड सांभाळून बोल.

बाई : ओ प्रधानजी बाई माणसांची कस बोलायचं हे शिकवं आधी तुझ्या राजाला...समता भाजी पाहिजे. (ताडकन् निघून जाते.)

महाराज : प्रधानजी ही बाई आपल्या काय काय म्हणाली.

प्रधान : महाराज पण तुम्ही असे म्हणायची काय गरज होती का? आपण आपलं समतेपुरतं बोलायचं.

महाराज : नाही नाही प्रधानजी काहीतरी गफलत होती आहे. चला प्रधानजी जरा राज्य फिरून येऊ बघुयात समता सापडतीये का? (दोघेही जातात.) (विक्रम वेताळाला घेवून येतो.)

वेताळ : (हासत) विक्रमा त्या राजाला समता सापडली नाही. राज्यभर फिरला तरी देखील सापडली नाही आता मला सांग कुठ असेल ही समता? (विक्रम काहीच बोलत नाही.) विक्रमा सांग कुठ असेल ही समता? (विक्रम काहीच बोलत नाही.) उत्तर दे विक्रमा नाहीतर तुझ्या डोक्याची १०० शकलं करेन.

विक्रम : वेताळा समता ही कुठल्या वस्तूत, भाजीत नसते. ती माणसांच्या खोल मनात दडलेली असते. सजीव सृष्टीत मनुष्य प्राण्याला सर्वश्रेष्ठ मानले आहे. कारण ते विचार करू शकतात. केलेला विचार लोकांशी बोलू शकतो. बोललेला विचार कृतीत आणू शकतो. मनुष्यप्राण्यामध्ये स्त्रिया आणि पुरुष एकत्र समाजात वावरत असतात. दोघेही समान आहेत. परंतु पुरुष नेहमी स्त्रीला कमी दर्जा देतो. तिला हिणवतो. कायम ती आपल्या ऐकण्यात राहिली पाहिजे असे त्याला वाटते. कायम तो तिच्यापेक्षा श्रेष्ठ आहे हे दाखवण्याचा, सिद्ध करण्याच्या प्रयत्न करतो आणि जो पुरुष आपल्या सोबतच्या स्त्रीला मानसन्मान देतो, आदर देतो, माणसाप्रमाणे वागवतो. तिथेच समतेला सुरुवात होते आणि तीच समता असते. न दिसणारी फक्त खोल मनात जाणवणारी आणिअसा समाज राज्यात नाही जो समतेवर आधारलेला आहे असे त्या साधूंचे म्हणणे असते.

वेताळ : वा...वा...वा... राजा विक्रमा एवढ्या मोठ्या प्रश्नाचं किती धीट उत्तर दिलस. वा हुशार आहेस. पण मी तुला सांगितले होते कि तू बोललास तर मी सोडून परत झाडावर जाईन म्हणून तू बोललास की मी चालली... (जातो)

***



लघुनाटिका

# घर-घर

निवेदक - नमस्कार मंडळी, आपल्या देशाला स्त्रिया आणि पुरुष ही रथाची दोन चाक आहेत आणि ती समान आहेत असे म्हणले जाते. पुरुषांनी कमवायचे आणि बाईनी घर सांभाळायचे ही अशी कामाची विभागणी आहे. पण पुरुषाचे हे पैश्याच्या रूपात मोबदला देते तर बाईचे काम हे मोबदल्याचे नसून ते तिच्या जबाबदारीचे, कर्तव्याचे आहे. म्हणून मोबदल्याशिवाय हे केलेच पाहिजे. अशी एकूण परिस्थिती आहे. दोघेही एकत्र समाजात वावरतात. पण पुरुषांचा वावर हा मुक्त आणि स्त्रियांचा वावर हा नियमांनी, अटींनी, जबाबदारींनी आणि वेळेंनी बांधलेला आहे असे दिसते.

सिन -

सकाळची वेळ बायको नवऱ्याला हाका मारते स्टेजवर फक्त बायको.)

बायको : आहो उठा, ८ वाजले, अहो उठलात का? (नवरा येतो खुर्चीत बसतो.)

नवरा : (आळस देत) पेपर नाही का आला?

बायको : बाहेर दारात पडले असतील बघा.

नवरा : अग मग आत नाही का आणायचे?

| | | |
|---|---|---|
| बायको | : | विसरले. |
| नवरा | : | तुम्हा बायकांचे ना असेच असते. पेपरशी काहीही संबंध नाही. जगात काय चालले आहे. जग कुठे चालले आहे. काही नाही. (नवरा पेपर आत आणतो. पेपर वाचतो. बायकोला हाक मारतो.) अग ए चहा आणतेस का? |
| बायको | : | हो हो देते. (बायको येते) हा घ्या आणि काय हो. काय असे दिवे लावता रोज तास तास पेपर वाचून. वाचायचा आणि ठेवायचा बाजूला. दुसऱ्या दिवशी दुसरा पेपर. तो वाचायचा आणि ठेवायचा बाजूला. अशी आणि जगातली खबर वाचताय. काय चाललेय म्हणता जगाची चर्चा करता घरात साखर संपली आहे ते पण बघा कधी तरी आणि जगावर चर्चा करण्यापेक्षा माझ्याशी चर्चा करा म्हणजे पोरांच काय चाललयं, घरात काय आहे, काय नाही हे सगळे समजेल. |
| नवरा | : | हो पैसे मी कमवून आणायचे आणि घर चालवायला पैसे द्यायचे, पोरांच्या शिक्षणाचे पैसे सगळे मीच करतोना. ८ तास राबतो. तेव्हा हे दिवस दिसतात. |
| बायको | : | ८ तासानंतर काय? |
| नवरा | : | नंतर काय सुट्टी. |
| बायको | : | बायको घरी २४ तास ऑनड्यूटी असते ते नाही दिसत. पैसे दिले की झालं. सांगा बर पोरं कितवीला आहेत आपली? |
| नवरा | : | काहीही हं तुझं. |

बायको : सांगा की !

नवरा : तो धाकटा बालवाडीला.

बायको : तो गेला आता पहिलीला.

नवरा : अरे वा छान.

बायको : छानं पुढ काय ?

नवरा : तो त्याच्या पेक्षा मोठा गेला तीसरीला

बायको : धाकट्याच्या पाठीवर झालाय तो लगेच.

नवरा : मग

बायको : मग काय ? धाकटा पहिलीला तर मग त्याच्यानंतरचा दुसरीला नसणार का ? पुढं

नवरा : पुढ पुढं काही नाही.

बायको : ते माहिती आहे. ते नाही विचारत.

नवरा : मग

बायको : तुमच्या आईच

नवरा : आईच काय

बायको : तुमच्या आईच वय काय आता ?

नवरा : असेल ५५-६०

बायको : ५५-६० आहे. ७३ संपेल आता.

नवरा : बर बर. पण आईच सगळ मीच करतो औषधपाणी, वगैरे.

बायको : कधी बसलात का १० मी. तिच्याजवळ. सकाळी चहा बिस्किट ते झालं की नाष्टा. नाष्टा झाला की सकाळच्या औषधांच्या गोळ्या ते झालं की अंघोळ त्या स्वतःच्या स्वतः उठू शकत नाहीत. त्यांना टॉयलेटला घेऊन जाण, आंघोळ घालण, बेडपॅन देण, दिवसभर त्यांच्या गोळ्यांची टायमिंग सांभाळण, उठवन, बसवन, सकाळी पोरांगच्या शाळेच आवरण. त्यांना डबा करून देणं. तयार करणं, रात्रीची भांडी घासण, कपडे धुणं, घर आवरून स्वयंपाकाच बघण काय आहे, नाही ते बघण. दुपारी पोर शाळेतून घरी आली की, त्यांना जेवण भरवण. सासुबाईंना मऊ भात करणं ते त्यांना देण. तुमच्या डब्याच बघण. तुमच्या सॉक्स पासून गाडीच्या चावीपर्यंत सगळं शोधून हातात देणं. तुम्ही साध आंघोळीला गेला तरी टॉवेल अशी हाक मारता. तो तुमच्या हातात द्यायचा. तुमचा डबा द्यायचा. दुपारी मुलांना झोपवायचे.

नवरा : आणि दुपारी सिरीयल बघत बसायचे.

बायको : हो सिरीयल बघता बघता रात्रीच्या जेवणाची भाजी नीट करणे, गवारी स्वच्छ करणे, तांदूळ निवडणे ही कामे पण करतो आम्ही. तुम्ही येणार साडेपाचला आणि चहा म्हणणार मग परत सुरू रात्री १२ वाजेपर्यंत किती असतात आमच्या कामाचे तास कुठे आहे आमचा कामाचा मोबदला बिन पगारी

आणि फुल अधिकारी. (निघून घरात जाते.)

नवरा : आग ए माफ कर मला. पैसे कमवणे एवढी एकमेव गोष्ट करून घर नाही चालत हे आल लक्षात. सॉरीऽऽऽ

बायको : रोज कामावरून जरा लवकर येत जा म्हणजे जरा पोरांचा अभ्यास वगैरे घ्याला. म्हणजे माझं काम जरा हलकं होईल. नाहीतर आई नेहमी नापास बाप फक्त पास. कामावरून सरळ घरी कधी यायचंच नाही तुम्हाला सांगते (लोकांना) हे गावं फिरणारं घरांची काळजी नाहीच त्या मोदींसारखी (लोकांना) आम्हीही माहिती ठेवतो म्हणल...

***


लेक लाडकी अभियान
व
किशोरी मेळावा
प्रमुख उपस्थिती
नवलकिशोर राम
(जिल्हाधिकारी,बीड)

# आम्ही सारे बदलतोय

(गाणं म्हणत ६-७ मित्र-मैत्रिणी प्रवेश-दिल दोस्ती दुनियादारी)

एकजण : हेऽऽ हेऽऽ हेऽऽ (टाळ्या देतात) या किती दिवसातून आपण भेटतोय.

२ : खरचं परीक्षा संपली सुट्ट्या लागल्या आणि सगळे गायब.

३ : मला दोघांचा फोन आला पण बाकीचे गायब कसे राहू शकलात माझ्याशिवाय यार

४ : मी तर ना गोवा फिरायला गेलेलो.

सगळे : ए वॉव...

५ : ए मस्त मज्जा केली ना.

४ : मस्त समुद्रात डुंबलो आहाहा काय फॉरेनर्स होत्या.

६ : ए बास ह एरवी घरातल्या बायकांना गोशात ठेवायचे. आपली परंपरा रूढी म्हणायचं. आमच्यात असं चालत नाही म्हणायचं आणि गोव्यात जावून हाफ चड्ड्या घालून उघड डुंबायच आणि कधी ही न बघितल्यासारख



फॉरेनर्सकडे डोळे फाडून बघायचं.

४ : मग तुझं काय म्हणणं आहे. डोळे मिटून घेवू यार तू म्हणजेना.. आणि हॅलो मॅडम गोव्यात आम्ही बाळ होऊन दूध प्यायला गेलो नव्हतो.

४ था व १ : (एकमेकांना टाळ्या देतात) ये बात...

७ : हे जे फालतु दुटप्पी पुरुषी वागणारे असतात ना त्यांचा मला प्रचंड राग येतो.

८ : हे सगळे असे जमून फिरायला जातात. घरातल्या बायकांना नाही नेत. त्यांना नेताना गणपतीपुळे, कोल्हापूरची आंबाबाई, जोतिबा असं नेतात. कारण त्यांना कळेल नां, यांचे उद्योग.

४ : ए माझ्या आयांनो माफ करा अजून किती आमची काढणार आहे. थोडी तरी ठेवा आणि विषय बदला.

सगळ्या मुली: ए बात... (टाळ्या देतात हासतात.)

१ : ए चला आपण सुट्ट्यांमध्ये काय काय केलं त्याची छोटी छोटी गोष्ट सांगायची चालेल? चांगल, वाईट सगळ हं...

२ : ए चालेल चालेल मस्त.

३ : ए पण सिरियस हं उगाच फालतूपणा नको...



५ : ए खास करून तू...

४ : अरे नाही रे मगाशी गम्मत केली.

६ : चला सुरू करा. ए सई तुझ्यापासून सुरू कर. (सई म्हणजे १ नंबर)

सई : ओके चालेल या सुट्टीत मी ठरवल होत की आपण काहीतरी वेगळ करायचं म्हणून मी हेमलकसाला गेले होते १० दिवस.

३ : हेमलकसा म्हणजे त्या सिनेमातलं ना? कोणता तो नाही का नाना पाटेकरचा.

सगळे : डॉ. प्रकाश बाबा आमटे

सई : करेक्ट...

४ : पण सई तो तर फारच मागास भाग आहे म्हणतात.

सई : तुला कशा अर्थाने म्हणायचं?

४ : म्हणजे विचारांनी परिस्थितीने वगैरे

२ : ए मुर्खा त्यांना मागास नाही अनडेव्हलप म्हणतात.

३ : म्हणजे ते कसेही जंगलात राहतात. कमी कपडे घालतात. बरोबर ना?

१ : जंगलात राहणारे लोक कमीच कपडे घालतात मी बघितलय डिस्कव्हीरवर,



ते शिकार करतात.

सई : बास बास कळली अक्कल तुमची, अरे हे सगळ जे म्हणताय ना असच माझही मत होत. पण मी तिथे शिबीराला गेले, सगळा गडचिरोली जिल्हा फिरले आणि मला माझीच लाज वाटू लागली. आपण राहतो, खातो, कपडे घालतो. सुसंस्कृत समजतो. आपला जिल्हा डेव्हलप स्टेट समजतो. आपल्या राज्यात क्रांती झाली म्हणतो. जगासमोर मिरवतो, मन की बात बोलतो शी... मलाच लाज वाटली... एकाच देशात एवढा विरोधाभास. एका बाजूला खाण्यासाठी अन्न नाही दुसऱ्या बजूला जेवताना पोट भरले म्हणून लाखो टन अन्न आपण फेकून देतो. करोडो रुपयांची उधळण करून मोठी मोठी लग्न लावतो. लाईट, पाणी सगळ्यांची उधळपट्टी करतो आणि त्याच वेळेला वितभर पोट भागवण्यासाठी वण वण फिरणारा आदिवासी मला दिसतो.

विरोधाभास... हो... हो... मला लाज वाटते. किती सुरक्षित वाढवतात आपले आईवडिल आपल्याला असे वाटले. मगाशी रवि तु म्हणालास की विचारांनी ते मागास असतात. नाही गडचिरोली जिल्ह्यात एकही रेप केस दाखल नाही. कुठल्या मागास समाजाविषयी बोलतो



आपण, ते जे कमी कपडे घालतात तरीही स्त्रियांकडे बघून त्यांच्या वासना चालवत नाहीत. आपल्या सारख्या सुरक्षित लोकांना त्या गोव्यात जाऊन चालवतात. फॉरेनर्स बघून मला तर त्या फॉरेनर्स महिला आणि आदिवासी महिला यांच्यात कपड्यांच बाबतीत काही फरक वाटत नाही ते ही कमी कपड्यात काही नसून फरक दृष्टीचा आहे एवढच खर. कोण कोणत्या नजरेने समोरच्याकडे बघतो हे मात्र गुढच आहे आणि हो गडचिरोली जिल्ह्यात गर्भलिंग निदानही केले जात नाही. कोणी त्यासाठी जात नाही. त्यामुळे तिथले मुला-मुलींचे प्रमाण समान आहे. खरचं मागास ते नाहीत आपण आहोत. प्रश्न रूढींचा नसतो, परंपरेचा नसतो प्रश्न असतो आपल्या विचारांचा आणि त्या विचारांसोबत कृतीचा त्यामुळे १० दिवसांनंतर मी ठरवल आपण चार चौकटीत नाही जगणार. एक शिक्षण दोन नोकरी तीन छोकरी व मुल आणि चार म्हातारपण या चौकटी मी मोडणार. मी या लोकांसाठी कायम काम करत राहीन. मी माझ्या आयुष्यात कुठेही राहीन पण सतत मला गडचिरोली व हेमलकसा जमिनीवर ठेवेल. थँयू... (सगळे उठून टाळ्या वाजवतात.)

१ : क्या बात है सई.



४ : तुझ्या या गडचिरोलीसमोर माझे गोवा फिके पडले. सॉरी. (डोळ्यात पाणी येते. पुसतो.) थँक्स सई भानावर आणलस. किती मस्तीत जगतो आपण. आई-बाप तर आपणाला पैशाची खाणच वाटते. माझ्यासारख्या तरुण मुलांचे आई-वडिल तर एटीएमच वाटतात. आम्हाला कॉलेजची फी, नवीन गाडी, टचस्क्रीन मोबाईल कोणाच्या जीवावर बापाच्या, चैनीच्या काय कल्पना असतात तेच कळत न सई चं ऐकल्यावर तर सुन्न झालो. सगळ्या चैनी फक्त मित्रांच्या अंधळ्या स्टेटससाठी मला तर, आता मी तोंड रंगवून माझा खरा चेहरा विसरणारा विदुषक वाटतो.

किती हा खोट्या प्रतिमांमध्ये अडकून ती तिच्या मैत्रिणींबरोबर बाहेर जातात. पाच मुले त्याला पकडतात, मारतात, बांधतात आणि मैत्रिणीवर पाचहीजण बलात्कार करतात. हो... हो... हो... मला लाज वाटते पुरुष असण्याची. अंगावरती कमी कपड्यात फिरणाऱ्या आदिवासी महिला व त्यांच्याभावेती वावरणारे पुरुष, तरिही एकही छेडछाडीचा आणि बलात्काराचा गुन्हा नाही. एकाच वेळेला इंडिया आणि भारत असे दोन देश विरोधाभासाने भरलेले आणि आम्ही इंडियातले लोक खोटे मुखवटे मिरवतोय, खरे चेहरे लपवत. मी बदलणार आहे सई मलाही नाही जगायचय



चौकटीत. मी तुझ्यासोबत आहे.बास.(सगळे शांत.)

३ : खरच यार बदल हा समाजातला अपरिहार्य घटक. मग तो बदल निसर्गातला असो वा मनुष्य प्राण्यातला. बदल अटळ पण तो बदल सकारात्मकरित्या असेल तर तो भलच करेल.

२ : बदलाची सुरुवात खोल मनातून व्हायला हवी.

६ : बदल आपल्यातल्या विचारांचा

७ : बदल आपल्यातल्या पुरुषी अहंकाराचा

८ : बदल आपल्या बुरसटलेल्या रूढींचा

१ : बदल आपल्या जुनाट परंपरेचा

२ : मी बदलतोय

सगळे : आम्ही सगळे बदलोय.

तुम्ही.....?

***




Stop
HONOUR
KILLING

# ऑनर किलींग

(खडकावर नदीकाठी बसलेले दोघे प्रियकर प्रियसी)

प्रियकर : किती शांत पाणी छान वाटते आहे ना ?

प्रेयसी : हम्‌हम्

प्रियकर : अस वाटतं ना असच बसाव तासन्‌तास

प्रेयसी : ओह मिस्टर आपण कॉलेजचे तास बुडवून आलो आहोत आणि ठरल्याप्रमाणे एकच तास. तुम्हाला बरे सुचतात तासन्‌तास.

प्रियकर : झालं आपटल जमीनीवर जरा कुठ रोमँटिंक व्हायचा प्रयत्न करतोय तर लगेच जमिनीवर आणून आपटायचं.

प्रेयसी : तुझ भान हरपू नये म्हणून आणि कायम जमिनीवरचा विचार कर जास्त हवेत जावू नकोस.

प्रियकर : आणि जमिनीवरचा विचार हा आहे की तू आज तुझ्या घरी गावी जाणार आहेस. तुझ्या बापाला...

प्रेयसी : आ

प्रियकर : तुझ्या खडूस वडिलांना सांगणार आहे की माझे एका मुलावर प्रेम आहे. (प्रेयसी

थांबवते.)

प्रेयसी : एक मिनिट, मिनीट. काय रे तुम्हा पोरांना स्वत:ची खात्री नसते का. एका मुलीवर प्रेम आहे. काय आहे अनेक जणीन नंतर मी असेल वाटतेना म्हणून म्हणल.

प्रियकर : कायम जमिनीवर आपट तुला माहिती आहे ना माझ्या विचारांची लिंक तुटली की परत मला शुन्यापासून सुरुवात करावी लागते. कुठे होतो मी.

प्रेयसी : एका मुलीवर प्रेम आहे.

प्रियकर : ह सही पकडे है। (दोघे हासतात) तर तू आस सांगायच मला फोन करायचा कि मी लगेच इकडून गाड्या करून माणसं घेवून येणार.

प्रेयसी : मग माझ्याकडची आणि तुझ्याकडची माणसे अशी दोघांची हाणामारी गांधी मैदानावर लागणार आणि सर्व सातारकर ती बघायला जमणार.

प्रियकर : आयच्या गावात तु मलासारखी जमिनीवर का आपटतेस ?

प्रेयसी : कारण स्वप्न आणि सत्यात फरक असतो मला माहित नाही. माझे वडिल या सगळ्यावर काय रिॲक्ट होतील. पण डोन्ट वरी. आय विल मॅनेज.

प्रियकर : यार खरच जेव्हा तू त्या इंग्लिश पिच्चर मधल्या सारख बोलतीस ना तेव्हा मला तू त्या टायटॅनिक मधल्या डेअरिंग करून पळून जाणारी नटी आहे ना काय बरं... हा रोज तशी वाटतेस.

प्रेयसी : आणि जेव्हा तू असा बोलतोस ना तेव्हा तू फॅन्ड्रीतल्या जब्या सारखा वाटतोस. (जोरात हसायला लागते.)

प्रियकर : (हा शांत) करा चेष्टा करा.

प्रेयसी : चिडू नकोरे गम्मत केली थोडीशी.

प्रियकर : (थोड्या वेळ शांत बसतात. प्रियकर एकटक नदीकडे बघत) माणसांचे स्वभाव पण गूढ

असतात या नदीसारखे. वरून शांत पण आतून घडामोडी घडत असतात. खोलवर.

प्रेयसी : निसर्ग धर्म आहे तो सरळ, सोप साध वाटणार तस कधीच नसत प्रेमाचही तसच आहे प्रेम हे करून टाकायची गोष्ट नसते. ते खूप विचारपूर्वक जबाबदारीने स्वीकारायची गोष्ट आहे. गाड्या घेऊन मुलींना मग घेवून चकरा मारणे, घरापर्यंत मागे मागे जाणे, कुणाचेतरी आलेले मेसेज व्हॉटस्‌ॲपवर फॉरवर्ड करणे, फॉरवर्ड केलेले लगेच डिलीट करणे हे सगळ नाही आवडत अलीकडच्या मुलींना. त्यांना मुलांचा स्वभाव, वर्तणूक, घरचे वातावरण, मित्रमंडळी कसे आहेत. तो व्यसनी आहे का ? हे सगळ मैत्री दृढ करण्यासाठी महत्वाचे ठरतात. (घड्याळ बघते.) बापरे मला निघायचय. शेवटची एस.टी.तरी मिळू दे.

प्रियकर : ए बस ना थोडावेळ किती छान बोलतेस ना तू?

प्रेयसी : काय आहे ना प्रत्येक प्रेमात पडलेला सुरुवातीला हिच वाक्य बोलतो. किती छान दिसतेस. किती गोड बोलतेस. ऐकत राहाव असं वाटतं.

प्रियकर : अरे काय प्रॉब्लेम आहे तुला?

प्रेयसी : एक काम कर हा दगड घे आणि आणि पाण्यावरती असा मार की ती चार ते पाच वेळा पाण्यावरून उडत गेला पाहिजे. ओके. हा घे. बाय बाय.

प्रियकर : अग थांब आलो. (स्टेजच्या आत गेल्यानंतर) मला कळव फोन वर काय होतय ते... (सिन बदलतो मुलीच्या घरी मुलगी आलीये वडील आणि मुलगी बसलेत.)

वडिल : उशीर झाला तुला यायला, अंधार पडायला लागला.

मुलगी : हो गाडी मिळायला पुण्यावरून उशीर झाला म्हणून.

वडिल : तुला सांगितल्या आपल्यात पोरीच्या जातीनं रात्रीच्या आत घरात याव.

मुलगी : हो

वडिल : काय म्हणतयं कॉलेज?

मुलगी : चाललयं ठिक. दादा मला जरा बोलायचंय तुमच्याशी.

वडिल : काय पैसे पाहिजेत का?

मुलगी : नाही पैसे नकोत.

वडिल : आणि हो, ते कॉलेज संपवा लवकर स्थळ आलय चालून. चांगला सरकारी नोकरीला हाय तो.

मुलगी : दादा मला आता नाय करायच लग्न.

वडिल : मग कधी वय झाल्यावर?... ते कायबी नाय. लग्नाच आम्ही बघतोय उरकून टाकायचं.

मुलगी : दादा तुम्हाला. मला अडचणीत नाही आणायच. कुणाला तरी शब्द द्याल आणि...

वडिल : आणि काय... आणि काय... तुझी काय भानगड तर नाही ना बाहेर. हे बघ आपल्या समाजात हे चालत नाय काय येगळी भानगड करायची नाय. आमच नाक कापायचा नाय.

मुलगी : दादा माझ प्रेम आहे एका मुलावर

वडिल : काय प्रेम? (तिच्या आईला आत हाक मारतो.) अहो ऐकलका प्रेम हाय म्हणते हो. तुला काय पुण्याला ह्यासाठी शिकायला ठेवलं होत का? हे बघ गावात मान हाय आमचा आमचं नाक कापायचे धंदे करायचे नाहित.

मुलगी : दादा, चांगला मुलगा आहे तो.

वडिल : चांगला, काय नाव काय त्याच, आणि कुठ भेटला तो तुला?

मुलगी : कॉलेजमधेच शिकतोय 'प्रविण' त्याच नाव.

वडिल : प्रविण काय आडनाव काय?

मुलगी : वाघमारे

वडिल : वाघमारे म्हणजे खालच्या जातीतला.

मुलगी : दादा, आता जात-पात सगळं मागे राहिलेल्या, बुरसटलेल्या कल्पना आहेत.

वडिल : आपल्यात हे चालणार नाही. तोंडात शेण घालतील माझ्या. कुळाला बट्टा लावू नकोस ग बाई आपल्या समाजात माझ्या मान-पान प्रतिष्ठा आहे. एक वेळ मराठा असता तर आपल्यातला म्हणून स्वीकारले असत. पण हा तर...

मुलगी : दादा मी तुमच्या शब्दाबाहेर नाही जोपर्यंत तुम्ही हो म्हणत नाही तोपर्यंत आम्ही कोणताही निर्णय घेणार नाही. परस्पर लग्न करणे आम्हाला शक्य होते पण तुमच्याशी मी बोलू शकते म्हणून बोलतीये. दादा प्लीज.

वडिल : ठिक आहे बघुयात. मला मुलाला भेटव मगच ठरवूयात.

मुलगी : थँक्यू दादा. (हातात हात घेते.) (सिन बदलतो रात्र होते सगळे झोपलेत पहाटे वडिल उठतात शांतपणे तोंड धुतात. कु-हाड घेतात आणि झोपलेल्या पोरीच्या डोक्यात घालतात व शांतपणे पराक्रम केल्यासारखे उभे राहतात मुलगी रक्ताच्या थारोळ्यात बाप शांत पणे उभा.)

निवेदक : मंडळी सख्ख्या बापानं मुलीच्या डोक्यात कु-हाड घालून खून केला. जातीच्या आणि प्रतिष्ठेच्या खोट्या कल्पनांनी एका मुलीचा बापाने खून केला. त्या मुलीने केलेला निर्णय चूक होता? बापाने केलेले कृत्य समर्थनीय होते? प्रतिष्ठा आणि जात हे स्वतः:च्या मुलीपेक्षाही मोठे आहे का ? नाही ना ? या घटनेचा आपण सगळ्यांनी मिळून विरोधच केलाच पाहिजे. सख्खा बाप असला तरी...

***



# नाटकाचे-नाटक

(लघुनाटिका)

(मुली नाचत स्टेजवर येतात गाण म्हणत)

आले आले नाटकवाले।।१।।
प्रेक्षक सगळे स्तब्ध झाले
कसा जमला हा यो मेळ
आज बघाय नवीन खेळ।।२।।

मुलगा १ : वा वा वा काय यमक जोडलाय वा वा वा

मुलगा २ : यमकाच गमक (सगळे रिस्पॉन्स देतात.)

सगळे : वा वा वा

मुलगी १ : अरे, पण आज कोणतं नाटक करायचे आहे?

मुलगा ३ : मला तर काहीच सुचत नाही.

मुलगा १ : आरे यार ते लेखक कसे काय लिहितात राव मोठी मोठी नाटकं?

मुलगी ३ : आरे ते खूप विचारवंत असतात.

मुलगी २ : त्याला खूप पुस्तक वाचावी लागतात.

सगळे : हममम्

मुलगा २ : मला काय वाटतय सांगू ?

सगळे : सांगा महाराजा

मुलगा २ : जेव्हा काही सुचत नाहीना लिहायला, तेव्हा ऐतिहासिक घटनांचा आधार घ्यावा.

सगळे : म्हणजे काय महाराजा

मुलगा २ : म्हणजे लिहिण्यासाठी आधी प्रसंग डोळ्यासमोर आला पाहिजे. म्हणजे शब्द सुचतील आणि प्रसंग असे डोळ्यासमोर आणा जे माहितीतले आहे आणि आपल्याला तर ऐतिहासिक घटना भरपूर माहिती आहेत.

मुलगी १ : ऐ म्हणजे शिवाजी महाराजांच्या, जिजाऊंच्या, गांधीच्या

मुलगा ३ : ये गांधीच्या नको हं

मुलगी १ : का गांधीशी तुझं काय वाकड आहे का ?

मुलगा ३ : नाही. गांधीशी माझं काही वाकड नाही. गांधी सध्या तरी आपल्या मनात, वागण्यात ठेवा. त्यांना सध्याच्या परिस्थितीत बाहेर काढू नका.

मुलगी २ : काय बडबडतोसय बाहेर काढू नका. म्हणजे काय ?

मुलगी ३ : ऐ गांधींची चेष्टा नाही हं करायची.

मुलगा ३ : आरे काय बडबडताय गांधी हा चेष्टेचा विषय असूच शकत नाही. त्यांच्या कामाविषयी बोलायचा व त्यांच्याविषयी बोलायचा आपणा कुणालाही अधिकार नाही. कारण आपण त्यांच्या मायनस ०० इतकही काम करत नाही. त्यांच्या संदर्भाने काही चुकीचा गैरसमज पसरवायला काही अक्कल लागत नाही.

मुलगा १ : आरे मग गांधी नको असे का म्हणतोस ? त्यांच्या कामाचा इतिहास चालत नाही

का?

मुलगा २ : का फक्त काळ्या पाण्यावर गेलेल्यांचा इतिहास चालतो का कपड्यांच्या होळीचा इतिहास चालतो?

मुलगी १ : का अफजलखान ही मुस्लिम होता आणि त्याच्या कोथळा बाहेर काढणारे हिंदू राष्ट्राचे जनक छत्रपती शिवाजी महाराज यांचांच इतिहास चालतो.

सगळे : बोल ना बोल ना कोणता इतिहास चालतो बोल बोल.

मुलगा ३ : ए गप्प बसा... असा अविचारांच्या इतिहासांचा भडिमार केला तर मी माझा पुरस्कार परत करीन.

सगळे : हसतात टाळ्या देतात.

मुलगा २ : पण का अस म्हणत होतास?

मुलगा ३ : आरे मी गांधी बोलायला लागलो ना कि नथुराम बोलायला लागतो.

सगळे : जोरजोरात हसायला लागतात.

मुलगी १ : ए आपण राम आणि सितेवर काही तरी करूयात का? सध्या तेच कमी वादात आहेत.

मुलगा ३ : पण राम आणि सिता यांचा कोणता प्रसंग दाखवू शकतो? रावणाचा दाखवूया सीतेला पळवून नेण्याचा क्रूर रावणाचा सीतेवर घाला.

मुलगा २ : एक मिनीट. हे काय होत? क्रुर रावणाचा सितेवर घाला? क्रुर रावण?

मुलगा १ : तू काय रावणाचं समर्थन करतोयस?

मुलगा २ : आरे रावण वाईट होताच पण हल्लीच्या पुरुषांसारखा नव्हता. त्याने सीतेला पळवून

नेल. स्वतःच्या ताब्यात ठेवलं आणि शेवटपर्यंत तो तिला लग्न करायची विनंती करू लागला पण तिच्या इच्छेविरुद्ध त्याने तिला टच पण केला नाही पण हल्लीचे पुरुष अपहरण, बलात्कार, विनयभंग करतात. म्हणून म्हणालो. क्रुर रावण न म्हणता कपटी रावण म्हणा. पण खर तर लक्ष्मणाने रावणाच्या बहिणीचे शुर्पनखेचे नाक कापले नसते तर एवढ लफड वाढल नसतं.

सगळे : ए ए ए ए...

मुलगा २ : सॉरी सॉरी एवढे रामायण झाले नसते.

सगळे : हसतात.

मुलगी २ : ए आपण शेवटचा सीन करूयात का? ते वनवासातून परत येतात अयोध्यात. (सगळे दोन्ही बाजूनी उभे राहतात. फुले टाकतात. राम व सिता मधून चालतात, मागे लक्ष्मण चालतोय.)

राम आला रे आला अयोध्येत
सिता - लक्ष्मणा संगत
दिवे उजळले उजळले उजळले अयोध्येत
राम नामाचा जप करत
राम आला रे आला अयोध्येत
सिता-लक्ष्मणा संगत

(सगळे निघून जातात, सिता व राम स्टेजवर)

राम : सिते चौदा वर्षे माझ्यासोबत येवून तू वनवास सहन केलास. सिते तू मला साथ

दिलीस. दु:खात असूनही सतत हसत राहीलीस. मोह-माया कशाचाही तुला जराही स्पर्श झाला नाही. विश्वासाने तू माझ्या सोबत राहिलीस. सिते तू धन्य आहेस किती विश्वास, श्रद्धा दाखवून तू माझ्यासोबत जंगलात राहिलीस. धन्य धन्य झालो मी.

सिता : स्वामी, ते माझे कर्तव्य होते.

एकजण : (स्टेज वर येतो.) महाराजांचा विजय असो

राम : तू कोण?

एकजण : मी आपल्या राज्यातला धोबी.

राम : हा हा इथे.

धोबी : मला काहीतरी सांगायचय

राम : बोल

धोबी : (काहीतरी रामाच्या कानात सांगतो आणि निघून जातो.)

राम : सिते... (जोरात ओरडतो.)

रामाने घेतला संशय सितेवर
म्हणू लागला सांग काय घडलं ते खरं
कोणाबरोबर काय केलसं
सांग घटना सविस्तर, सांग घटना सविस्तर.

सिता : स्वामी, मी पवित्र आहे. तुमच्याशिवाय दुसऱ्या पुरुषाचा विचार मी कधी केला नाही. मी पूर्ण पवित्र आहे. मी पवित्र आहे.

राम : सिते जर तू पवित्र असशील तर ते तुला सिद्ध कराव लागेल.

सिता : ज्या विश्वासाने मी तुमच्यासोबत १४ वर्षे जंगलात राहिले. रावणाने मला पळवून नेले पण माझ्या अंगाला हातसुद्धा लावला नाही तो माझ्याशी लग्नाची मागणी करत होता. पण मी पतिव्रता आहे आणि कायम तशीच राहणार. या माझ्या विश्वासाला कधी तडा जावू देऊ नका स्वामी.

राम : नाही तुला अग्निपरीक्षा द्यावीच लागेल. चल चल (ओढतो.)

सिता : (बेअरिंग बदलते आणि गावठी बाईप्रमाणे)

ए तुला लाज नाही वाटतं, जिन तुझ्यासोबत आयुष्याची माती केली तिची अग्निपरीक्षा मागतोय. बायको म्हणजे काय खेळणं वाटलं व्हाय रे. जीन आयुष्य काढल तुझ्याबर आणि कोण्या धोब्याच्या सांगण्यावरून संशय डोक्यात घेतोस आणि अग्निपरीक्षा मागतोस लक्षात ठेव ते वरच्या पेटलेल्या लाकडांनी ती बाई घरदार संसार आणि देशही पेटवू शकते तिच्या वाटेला जाऊ नकोस ही आग आहे आग आणि सांग सगळ्या... (एकजण स्टेजवर येतो ए अस काय घडल नाही रामायणात पडदा टाका सगळे स्टेजवर येतात व जातात.) (निवेदक पुढे येतो.)

निवेदक : काय मंडळी राग आला हल्लीच्या सीतेवर संशय घेणारे संशयावरुन तिला मारणारे, जाळणारे, हाकलणारे राम आपल्या देशात आहेत. का स्त्रियांनी सोसायचे असाही प्रश्न पडेल? पण रामाने असे वागणे अपेक्षित होते का? तो ही एक पुरुषच होता...

तु चाल पुढं चाल पुढं गं बाई
पुढे चालता चालता मागे वळून कागं पाही
बाबासाहेबांनी घटना लिहली समतेचीही ग्वाही दिली
जोतिबांनी विहिर खुली केली
त्याचं जगणंच खर हाय लढण्याचं बळं
तुझ्या मागं हाय उभी सावित्री खरी
तु चाल पुढं चाल पुढं गं बाई ....
तु तर वणव्यातील आग, आगीनंतरची धग
जरा फुंकर मारुन तर बघ
कस पेटतया रान आगीच्या त्या ठिणगीन
अशी ताकद आहे तुझ्या या नजरेमधी
तु चाल पुढं चाल पुढं गं बाई ....
मनात विचार ठेव पक्का तु तर हुकमाचा हाय ऐक्का
व्यवस्थेला मारशील धक्का
कोसळतील रितीभाती उध्वस्त होतील नाती
काय दम हाय म्हणतील या बाईमधी
तु चाल पुढं चाल पुढं गं बाई ....

***

'लेक लाडकी अभियान' प्रस्तुत

# पथनाट्य

## —एक जिवंत नाटक...



शफदर हाशमी यांच्या स्मृतीस अर्पण...




पथनाट्य
पथनाट्य
लेक लाडकी अभियान

# प्रश्नांचे बंध झुगारुन

प्रश्नांचे बंध झुगारून, सत्याची कास धरतो.
पथनाट्यामधूनी आम्ही हे जीवन नाटक करतो ..।।धृ।।
जरी असतील लाख अडचणी, रूढींची मेखही जुनी
परंपरा जपते कोणी, धर्माची जुनीच गाणी
या रूढी परंपरेला, आम्ही खडा सवाल करतो,
पथनाट्याच्यामधुनी, आम्ही हे जिवंत नाटक करतो.
पथनाट्यामधूनी आम्ही हे जीवन नाटक करतो
प्रश्नांचे बंध झुगारून ....।।धृ।।
दुःखाच्या जाणीवा जेव्हा जखमांतुनी वाहती तेव्हा,
त्या मुक आक्रोशासाठी, आम्ही रस्त्यावरती लढतो,
पथनाट्यामधूनी आम्ही हे जीवन नाटक करतो
प्रश्नांचे बंध झुगारून ....।।धृ।।
जे भयंकर असे घडते, जे सडकेवर असते
हे प्रश्नाचे मृगजळ असते, पाण्यासम वाटते
प्रश्नांच्या जवळ जाता, कसे ते दूर पळते?
या साऱ्या प्रश्नांना आम्ही निर्वस्त्र नागवे करतो
पथनाट्यामधूनी आम्ही हे जीवन नाटक करतो
प्रश्नांचे बंध झुगारून ....।।धृ।।

कैलास जाधव